# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**दिनांक ३०.८.२००५ रोजी (दिनांक १८.८.२००५ ची तहकूब सभा)संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त्त**

मंगळवार दिनांक ३०.८.२००५ रोजी मा.महापौर श्री. किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मूख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १२.५५ वाजता '' वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगलाल
२०. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२१. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.सौ.खान अजरा जबीन मसूद
२५. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२६. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२७. स.स.सौ.यास्मीन बेगम अ.कदीर
२८. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
२९. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३२. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३४. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३५. स.स.श्री.खान निसार मो.खान
३६. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान

३७. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
३८. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४१. स.स.श्री.अमोदी अबुबकर बीन सईद
४२. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४३. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४४. स.स.श्री.तुपे त्रिबंक गणपतराव
४५. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४६. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
४७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४८. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
४९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५०. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५१. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५२. स.स.सौ.महाजन मनिषा अमर
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५५. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५६. स.स.श्री.खुडे विजय किसन
५७. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
५८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६०. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६१. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६३. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६४. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.श्रीमती वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.सौ.जाधव संगिता विठ्ठलराव
६९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७१. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७२. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७३. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७४. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७६. स.स.श्री.जहागिरदार अजीज मुख्तार
७७. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.राजेश व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**संवाद :**

श्री.संजय जोशी : अनेक वर्षापासून आरोग्य विभागा मार्फत पिण्याच्या पाण्यात टाकण्यासाठी क्लोरीनच्या गोळया दिल्या जात असे परंतू आता क्लोरीन लिक्वीड देण्यात येते. सदर क्लोरीनच्या बॉटल हया ६ महिण्यापूर्वीच्या खरेदीच्या असतांना वाटप केल्या जात आहे. नगरसेवकांच्या घरी दिल्या जातात मला पण देण्यात आलेली आहे ज्यांनी मागणी केली त्यांना दिल्या जात नाही . नगरसेवकांच्या घरी आणून देतात. दूर्दैवाची बाब आहे. नगरसेवकांना सांगण्यात येते की वाटप करावे महानगरपालिकेकडे कर्मचारी नाही का? सदर क्लोरीन लिक्वीडची मूदत ६ महिने असते ती मूदत संपलेली असावी अशी माझी माहिती आहे. असे असेल तर नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू शकते याची दखल घ्यावी . (सिलबंद नसलेली बॉटल सभागृहात मा.महापौर यांना दाखवतात)

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:चर्चेला परवानगी दिलेली आहे का ?माझा या मुद्यावर विरोध नाही चर्चा अगोदर घेणार आहात का?अर्धा तास चर्चेसाठी ठेवावा.

मा.महापौर :अर्धा तास चर्चेसाठी देण्यात येत आहे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे कर्मचारी यांनी नगरसेवकांच्या घरी क्लोरीन लिक्वीड पोहचते केले किंवा नगरसेवकांनी स्वत:हून मागणी केली होती.

श्री.मनमोहसिंग ओबरॉय : नगरसेवकांना दिली असेल तर योग्य आहे परंतू वाटप करा असे म्हणने चूकीचे होईल जनतेच्या आरोग्याचा प्रश्न आहे सदर क्लोरीन बॉटल मुदतबाहय झालेल्या आहेत का ?खुलासा घेण्यात यावा.

श्री.संजय जोशी :किती दिवसापूर्वी क्लोरीन खेरीदी केलेले आहे त्यामूळे पाणी शुध्द होते का ? नसता नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते .उत्पादनाची तारीख काय आहे.कोणत्या कंपनीचे उत्पादन आहे ई.सर्व माहिती घेण्यात यावी.

श्री.अ.रशिद खॉन :स.सदस्य यांना क्लोरीन लिक्वीड बॉटल देण्यात आल्या आम्हाला दिलेल्या नाही याचे कारण काय?

मा.महापौर :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी :यापूर्वी पाण्यात टाकण्यासाठी क्लोरीनच्या गोळयाचा वापर होत असे. उपलब्ध नसल्याचे आता क्लोरीन लिक्वीड खरेदी करण्यात आले मार्च महिण्यात मागणी केलेली होती माहे मे महिण्यात क्लोरीनच्या बॉटल उपलब्ध झालेल्या आहेत महानगरपालिकेच्या प्रत्येक दवाखान्यात तसेच झोन कार्यालयात हया बॉटल उपलब्ध करून दिलेल्या आहेत महानगरपालिकचे २० एमपी डब्ल्यू आहे त्यांचे मार्फत शहरात वाटप करण्यात येत आहे ज्यांनी मागणी केली त्यांना दिल्या आहेत ८५४५४ घरात वाटप केले आहे झोन कार्यालयात या बॉटलस् देऊन तेथील स्वच्छता निरीक्षक व जवान यांना किती पाण्यात किती थेंब हे लिक्वीड टाकायचे या बाबत प्रशिक्षण दिलेले आहे. शाळेमधे सुध्दा देण्यात आले या विभागाच्या कर्मचाऱ्यानी काही स.नगरसेवकांच्या घरी सुध्दा दिलेले आहे काही नगरसेवकांच्या घरी हया बॉटल उपलब्ध करून दिल्या आहेत.

सौ.लता दलाल :काही नगरसेवकांच्या घरी दिलेल्या आहेत का , सर्व नगरसेवकांच्या घरी दिल्या खुलासा करावा.

आरोग्य वैद्य . अधिकारी :प्रत्येकांकडे दिलेले आहे.

मा.महापौर :उत्तर बरोबर दयावे नगरसेवकांनी मागणी केल्यानुसार दिले की, स्वत:हून कर्मचाऱ्यानी पोहच केले.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :नगरसवोकंनी सूचना दिलेल्या असतात विभागाने त्यांचे काम करावे स.सदस्य श्री. जोशी यांनी उपस्थित केलेला मूद्दा आरोग्याशी निगडीत आहे नगर सेवकांना कडे बॉटल देऊन कामाला लावू नये.

श्री.संजय जोशी :क्लोरीन लिक्वीड बॉटल मी मागणी केलेली नव्हती ही दुरूस्ती करावी स्वत:हून कर्मचाऱ्यानी आणून दिली.

मा.आयुक्त :शहरात जेथे साथीचे रोग पसरण्याची शक्यता असते तेथे क्लोरीन गोळया किंवा क्लोरीन लिक्वीड आरोग्य विभागाचे एमपीडब्ल्यू मार्फत देण्यात येते किती पाण्यात किती लिक्वीड टाकायचे ही माहिती एमपीडब्ल्यू मार्फत दिली जात आहे . स्वत:हून या विभागाचे कर्मचारी यांनी नगरसेवकाकडे एकपेक्षा जास्त बॉटल दिल्या असतील कूणी मागणी केली तर दयावे या उद्देशाने परंतू ते बरोबर नाही. नगरसेवकांना त्या संबधीचे प्रशिक्षण दिलेले नाही .एक्सपायर डेट ६ महिण्याची असते ते तपासणी करून घेतली जाईल मुदत संपलेली कोणती क्लोरीन लिक्वीड बॉटल जनतेपर्यत जाणार नाही याची दखल संबधीत अधिकारी घेतील.

श्री.सिताराम सुरे :सुजाता हौसींग सोसायटीच्या अतिक्रमणाच्या संदर्भात १८ तारखेच्या बैठकीत मुद्दा उपस्थित केला होता सदर अतिक्रमण काढणया संदर्भात ८ दिवसाची मूदत देण्यात आलेली होती का कार्यवाही झालेली नाही.

श्री.देसरडा प्रशांत :स.सदस्य श्री. सुरे यांनी १८ तारखेच्या बैठकीत सुजाता हौसींग सोसायटीच्या अनधिकृत बांधकाम संबधी मुद्दा उपस्थित केला होता त्यावर आपण संचिका मागवून घेण्याच्या सुचना दिल्या तरी सुध्दा प्रशासकीय अधिकारी यांनी चुकीचा खुलासा केला व त्यावर ही बाब आपल्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला परंतु कार्यवाही करू असे आपण म्हटले होते व या बैठकीत माहिती घेणार होते प्रशासकीय अधिकाऱ्या बध्दल माझे असे मत आहे की या विभागातील कर्मचारी हे अधिकाऱ्याचे सुचनेचे पालन करीत नाही प्रशासकीय अधिकाऱ्याचा कोणताही वचक कर्मचाऱ्यावर नाही हे माझे वैयक्तीक मत आहे. वर्षानुवर्ष इमारत निरीक्षक त्याच विभागात काम करतात . तत्कालीन आयुक्त मा. श्री. शर्मा साहकब यांनी १-२ कर्मचाऱ्याच्या संचिकेत असे नमूद केले होते की प्रशासकीय विभागात यांना काम देवू नये तरी सुध्दा सहारूयक आयुक्त १ यांनी त्याची नियुक्ती प्रशासकीय विभागात केली प्रशासकीय अधिकारी यांची बदली करावी जेणे करूनया विभागाचे काम व्यवस्थित चालेल. माझ्या ही वार्डातील काही प्रश्न होते प्रशासकीय विभागाने कार्यवाही केली नाही.स.सदस्य श्री. सुरे यांच्या प्रश्नाचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर :७ दिवसात चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते आतापर्यत काय कार्यवाही केली खुलासा करावा.

मा.आयुक्त :संचिका मागवून घेतली होती दोन घरे वगळता संपूर्ण घरे अनधिकृत आहेत भिंत बांधून रस्ता बंद केला ते अधिकृत आहे ते ही काढावे २००० पूर्वीचे घर असेल तर गुंठेवारी मधे रेक्यूलर करावे लागेल नसता १००टक्के काढावे या संबधी अशा सुचना केल्या की अनधिकृत भिंत बांधकाम केले ते काढावे व ज्यांनी अनधिकृत बांधकाम केले त्यांना नोटीस दयाव्यात एक ले आऊट मंजूर केला होता त्यांनतर मालकी हक्का बध्दल वाद निर्माण झाला त्यातील एक एकर जागा कूणीतरी कूणास विकली होती. मालकी हक्का बध्दल प्रकरण न्यायालयात होते जो ले आऊट मंजूर केला होता त्या पैकी एक एकर जागेचा आपसात वाद मिटला असावा त्या ले आऊट प्रमाणे विकास झालेला नाही जे रस्ता मागणी करीत आहे त्यांचे घर पण अनधिकृत आहे.

श्री.सिताराम सुरे :शहरात ५० टक्के बांधकाम इनलिगल होत आहे कूणामूळे होत आहे ले आऊट मंजूर केलेला होता बेटरमेंन्ट चार्जेस भरून घेतले. त्या लोकांना रस्ता पाहिजे. अतिक्रमण झाले ते काढण्यात यावे.

मा.आयुक्त :वस्तुस्थिती अशी आहे जो ले आऊट मंजूर केला त्या प्रमाणे बांधकाम झालेले नाही रिवाईजसाठी लेआऊट मंजूर साठी प्रस्ताव दाखल केला नाही परवानगी घेतलेली नाही १०० टक्के लोक रस्त्याची मागणी करीत आहे तेथे सध्या रस्ता बंद आहे . मी अशा सूचना दिल्या की रस्ता मोकळा झाला पाहिजे दोन्ही ओपनस्पेस खाली होऊन ती पूर्ण जागा महानगरपालिकेच्या मालकीची व्हावयास पाहिजे सर्वाना नोटीस देण्यात यावे त्याप्रमाणे भिंतीचे सुध्दा अनधिकृत बांधकाम

असून ती काढण्यात येईल .खुली जागा व रस्ता क्लीअर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत .मागील जो व्यक्ती रस्त्याची मागणी करतात त्यांचे घर पण अनधिकृत आहे जे गुठेंवारीत बसेल त्यांचे ठेवता येईल अनधिकृत शहरात कूठेही असतील ते काढावे लागेल ही सर्व घरे इनलिगल आहे मोजणी करावी व पाडावे म्हणून नगररचना विभागाचा अभिप्राय आहे परंतू मी अशा सुचना केल्या की भिंत अगोदर पाडावी व इतरांना नोटीसा देण्यात याव्या.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :ले-आऊट मधील रस्ता असेल तर खूलास करावा सर्वावर कायदयाप्रमाणे कार्यवाही करण्याचे सुचना देण्यात याव्यात.

श्री.देसरडा प्रशांत :संबधीत नगरसेवकांचा प्रश्न आहे तो लेआऊट अस्तित्वात नाही रस्त्यावरील अतिक्रमण आहे याला नोटीस देण्याची गरज नाही.

मा.महापौर : सदर रस्ता हा अंतर्गत रस्ता असून नागरीकांना रस्ता व्हावा यासाठी ती जी भिंत आहे लोकांना त्रास होतो आहे २ दिवसात लोकांना रस्ता उपलब्ध करून दयावा अशा सूचना मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे

श्री.देसरडा प्रशांत :आपण रूलींग दिले आपले स्वागत करण्यात येते परंतू संबधीत अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली नाही तर त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल.

(याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक स.सभासद एकत्र येतात)

श्री.मो.जावेद मो.इसहाक :रशिदपूरा भागात ४० फूट डी.पी रस्ता आहे या रस्त्यावर मोठे अतिक्रमण होत आहे घरे होत आहे २ महिण्यापूर्वी पत्र दिले नकाशाही लावून दिला होता कार्यवाही काहीच नाही. कूणाचे सहकार्य लाभत आहे खुलासा देण्यात यावा.

मा.महापौर :प्रशासकीय अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.संजय सिरसाट :तहकुब सभेत इतर विषय घेणे योग्य नाही महत्वाचा विषय होता तो घेतला यानंतर इतर चर्चा करू नये.

प्रशासकीय अधिकारी :रशिदपूरा भागात पाहणी केली असता १५ अनधिकृत बांधकाम होते त्यांचेवर पोलीसात गून्हा दाखल करण्यात येईल परंतू संचिका अभिप्रायासाठी नगररचना विभागाकडे पाठविली असता मालकी हक्क तपासून कार्यवाही करावी असे आलेले आहे.

श्री.प्रशांत देसरडा :हा डी.पी रोड आहे का ?

प्रशासकीय अधिकारी :पोलीस बंदोबस्तात २ दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

श्री.पुनमचंद बम्हणे :माझ्या वार्डात साफसफाई होत नाही माझा वार्ड हा ग्रामीण भागात येतो दोन तीन दिवसानंतर पोळा हा सण येतो.साफसफाईसाठी मजूर कमी आहेत अनेक ठिकाणी कचरा पडून आहे त्वरीत उचलण्यात यावा ही विनंती.

श्री.देसरडा प्रशांत :हर्सूल हा भाग ग्रामीण भागात येतो २-३ दिवसानंतर पोळा सण आहे त्या भागात स्वच्छता असणे आवश्यक आहे साफसफाईस एकही मजुर नाही. संबधीतांना सूचना कराव्यात.

मा.महापौर :वार्ड अधिकारी यांनी याची दखल घ्यावी.

श्री.अ.रशीद खॉन :वार्ड अ चे अभियंता निलंबीत असून त्यांचे काम कूणाकडे दिलेले नाही वार्डातील साफसफाईचे काम होत नाही कचरा उचलला जात नाही वार्ड कार्यालय मुख्य कार्यालयाच्या नवीन इमारतीमधे शिफ्ट करण्यात यावे.

(याच वेळी स.सदस्य वार्ड कार्यालय अ हे मुखय कार्यालयाच्या इमारतीत व वार्ड कार्यालय ड हे पैठण गेट येथील महानगरपालिकेच्या इमारतीत कार्यान्वित करण्याची मागणी करतात.)

मा.महापौर :वार्ड कार्यालय ''अ'' हे मुख्य कार्यालयाच्या इमारतीत शिफ्ट करण्याची स.सदत्तस्यांनी मागणी केलेली असून ते शिफ्ट करण्या बाबत मा.आयुक्त यांनी कार्यवाही करावी तसेच क्रांतीचौक येथील वार्ड कार्यालय ''ड'' हे पैठण गेट येथील महानगरपालिकेच्या इमारतीमधे शिफ्ट करण्यात यावे अशा प्रशासनास सूचना करण्यात येत आहे हर्सूल येथील भागात मजूर देवून तो भाग ग्रामीन असल्यामूळे तेथे २ दिवसात स्वच्छता मोहीम राबवून कार्यवाही करण्यात यावी.

श्री.सलीम खान :वार्ड कार्यालय ''अ''मधे वार्ड अभियंता यांची नियुक्ती करण्यात यावी वार्ड अधिकारी श्री निकम काहीही ऐकून घेत नाही.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :वार्ड संदर्भात नियोजन करावे निर्णय घेण्यात यावा आवश्यकता पडल्यास सभागृहासमोर प्रस्ताव सादर करावा प्रत्येकाने मा.महापौर डायस जवळ जावून चर्चा करणे योग्य नाही ही पध्दत बंद करावी

मा.महापौर :चांगली सूचना केलेली आहे त्या सुचनाची सर्वांनी अमलबजावणी करावी ज्या सुचना सदस्यांना मांडावयाच्या त्या त्यांनी जागेवरूनच बोलावे आता विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

श्री.सलीम खान :वार्ड कार्यालय अ येथे वार्ड अभियंता नाही कर्मचारी कमी असून स्वच्छता होत नाही विकास कामे करण्यास या वर्षाचे ४ महिने बाकी असून विकास कामे होणार की नाही.याचा खुलासा करण्यात यावा.

मा.महापौर :स.सदस्यांच्या सूचनेची नोंद प्रशासनाने घेवून कार्यवाही करावी विषय क्र ८ वर चर्चा करावी.

**<u>विषय क्र. ५१/८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१३,३७६,३७७,३८३,३८४ अनुसार कोणत्याही स्वरूपाचा व्यवसाय करणे, कारखाना स्थापन करणे यासाठी महानगरपालिकेचे लायसन्स (परवाना) आवश्यक आहे. त्याशिवाय कोणताही व्यवसाय महानगरपालिका क्षेत्रात करू शकत नाही, अशी कायद्यात तरतुद आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर व्यवसायिक अस्थापना कार्यरत आहेत, त्यांनी महानगरपालिकेचे लायसन्स (परवाना) उपरोक्त नियमाच्या अधीन राहून घेणे बंधनकारक आहे.

याकरीता महानगरपालिका हद्दीत एकूण दुकाने, एकूण व्यावसायिक अस्थापने किती आहे, त्यांचे स्वरूप काय आहे, तेथे होणारा व्यवसाय व कार्यरत कर्मचारी संख्या या बाबीवरून लायसन्सची वार्षिक सेवा फी आकारावी लागेल.

याकरीता खाजगी एजन्सी मार्फत सर्व्हे आवश्यक आहे.सर्व्हे मध्ये खालील तीन बाबींचा समावेश राहील.

अ) शहरातील सर्व दुकाने व व्यावसायिक अस्थापना यांचा सर्व्हे करण्यात यावा. सदरील सर्व्हे करीत असतांना सदरील दुकानाचे क्षेत्रफळ तसेच त्या दुकानावर लावण्यात येणारे जाहिरात बोर्ड किंवा इतर जाहिराती यांचाही सर्व्हे करण्यात यावा.

ब) संपूर्ण माहिती ही विहित नमुन्यात सादर करण्यात यावी.

क) वरील कामांचे स्वंतत्र संगणक सॉफ्टवेअर तयार करून याद्वारे विविध रिपोर्ट निर्माण करण्यात यावे.

करिता खाजगी संस्थेमार्फत सर्व्हे करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

श्री.नरवडे वसंत :खाजगी सर्वे करण्याची गरज आहे का?

मुख्यलेखाधिकारी :सदरील व्यावसायीक शहरामध्ये कोठे आहे त्यांचेकडे कर्मचारी संख्या किती आहे क्षेत्र किती व व्यवसाय कोणता चालतो या संदर्भात सविस्तर माहिती महानगरपालिकेकडे असण्यासाठी व ती माहिती सादर झाल्यानंतर किती फीस आकारायची यासाठी सर्वे करणे गरजेचे आहे त्यासाठी खाजगी संस्थैमार्फत सर्वे करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:खाजगी संस्थे मार्फत न करता अस्थायी कर्मचारी ठेवून महानगरपालिके मार्फत सर्वेक्षण करू शकत नाही का , जे सुशिक्षीत बेरोजगार आहेत त्यांना काम दयावे सर्वच खाजगीकरण करणार काय ?

मुख्यलेखाधिकारी :मॅन पावर नाही वयोग्य पध्दतीने सर्वे करता येणे शक्य नाही जो अभ्यास सर्वेक्षण संस्थैला असतो तो इतरांना नसतो यापूर्वीही व्यावसायीक संस्थैमार्फत सर्वेक्षण करून घेतलेले आहे.

श्री.मनमोहसिंग ओबेरॉय :अनेक सुशिक्षीत बेरोजगार लोक आहे त्यांना काम दयावे स्पेकचे काय झाले. यापूर्वीही लाईटचे खाजगीकरण करण्या बाबत स्थायी समितीकडून मान्यता झाली. पॉलीसी मॅटर असेल तर या सभागृहात येणे आवश्यक आहे. सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर स्थायी समिती समोर यावयास पाहिजे.

मा.आयुक्त :स्थायी समितीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर येईल.

श्री.अ.रशीद खान :यापूर्वी खाजगी व्यक्तीला सर्वे दिला मोठया व्यक्तीला सर्वेचे काम देवून चुकीचा रिपोर्ट सादर केला तर यात गरीबांचे नुकसान होते.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :खाजगी एजन्सीकडून सर्वे करणे सोपे आणि कमी खर्चात होते महानगरपालिकेचे कर्मचारी सर्वे करतील असे वाटत नाही नसता खाजगी संस्थेकडे देण्याची गरज पडली नसती ज्या ज्या नवीन संस्था आहे रजिस्टर्ड ज्या सर्वे करणाऱ्या असतील ज्यांचे रिझर्ट चांगले असतील अशा संस्थेकडून सर्वे करून घ्यावा त्यानंतर जे दर ठरविले जाणार आहे ते सभागृहा समोर सादर करावे.

श्री.अ.रशिंद खान :महानगरपालिकेकडे २०० मजूर कर्मचारी आहे, ते क्लर्कचे काम करतात. त्याचेकडून काम करून घेण्यात यावे.

श्री.विनायक पांडे :स्वयसेवी संस्था या कामास पूढे येवून सर्वे करून देत असेल तर करावा.

श्री.देसरडा प्रशांत :मालमत्त्येचा सर्वे ज्या वेळेस दिला त्यावेळेस हा प्रस्ताव आला असता तर एकत्रीत सर्वे झाला असता व महानगरपालिकेस खर्च डबल आला नसता महानगरपालिकेकडे कर्मचारी उपलब्ध नाही म्हणून हा सर्वे व्यावसायकि संस्थे मार्फतच करण्यात यावा ठराव मंजूर करावा अशी विनंती आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:दूरूस्तीसह मंजूर करण्यात यावा की ६ झोन करावे ६ टेंडर मागविण्यात यावे यासह मंजूर करण्यात यावे.

श्रीकोकाटे काशिनाथ :दोन्ही माजी महापौर यांना नियमाचा चांगला अभ्यास आहे ६एजन्सी नेमण्याची दुरूस्ती सुचवली जाहीर प्रगटन करण्याचे प्रशासनाने स्वच्छ आणि पारदर्शक निर्णय सभागृहाने घेतलेला आहे तेंव्हा ८ टेंडर भरून येतील १० येतील कोणती संस्था हे काम घेऊ शकते आपण यात नियम व अटी टाकू शकतो का ? धोरणात्मक निर्णय या सभागृहाने घेतलेले आहे त्याची अमलबजावणी प्रशासनाने करून घेतली आहे विरोध न करता विधायक कामासाठी आणि महानगरपालिकेच्या इतिहासामधे पहिल्यादाच हा विषय येतो,विविध कारखान्यांनी लायसन्स साठी महानगरपालिकेकडे आलेले नव्हते .लायसन्स घेणे आवशक असतांना घेतलेले नाही महसूल वाढण्याच्या दृष्टीने हा विषय अत्यंत चांगला आहे कारखानदाराकडून जास्त उत्पन्न मिळणार आहे या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

श्री.मनमोहसिंग ओबेरॉय :एक टेंडर कॉल केले त्यात १२ टेंडर भरून आले तरी एकाच एजन्सीला काम जाईल ६ झोन करून त्याप्रमाणे टेंडर कॉल करावे ६ एजन्सी काम करतील कोणत्या एजन्सीने किती व कसे काम केले त्याकडे प्रशासनानचे कन्ट्रोल नाहील.

मा.महापौर : हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत असून प्रशासनाला वाटत असेल तर ६ प्रभाग समितीला करावे वाटत असेल तर तसे करण्यात यावे विषय जशाचा तसा मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीत एकूण दुकाने, एकूण व्यावसायिक अस्थापने किती आहे, त्यांचे स्वरूप काय आहे, तेथे होणारा व्यवसाय व कार्यरत कर्मचारी संख्या या बाबीवरून लायसन्सची वार्षिक सेवा फी आकारणेस तसेच याकरीता खाजगी एजन्सी मार्फत सर्व्हे आवश्यक असल्यामूळे सर्व्हे मध्ये खालील तीन बाबींचा समावेश राहील. यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

अ) शहरातील सर्व दुकाने व व्यावसायिक अस्थापना यांचा सर्व्हे करण्यात यावा. सदरील सर्व्हे करीत असतांना सदरील दुकानाचे क्षेत्रफळ तसेच त्या दुकानावर लावण्यात येणारे जाहिरात बोर्ड किंवा इतर जाहिराती यांचाही सर्व्हे करण्यात यावा.

ब) संपूर्ण माहिती ही विहित नमुन्यात सादर करण्यात यावी.

क) वरील कामांचे स्वंतत्र संगणक सॉफ्टवेअर तयार करून याद्वारे विविध रिपोर्ट निर्माण करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र सरकारने दहाव्या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक समुहाच्या विकासासाठी मदत करण्याचे ठरविले आहे, या योजनेतंर्गत नविन प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी २५% रक्कम या समुहात सहभागी होणाऱ्या घटकाकडून जमा होणे अपेक्षित आहे व सदर प्रकल्पास केंद्र सरकार ७५% आर्थिक सहाय्य अनुदान स्वरूपात देईल.

या योजनेचा लाभ घेण्याचा दृष्टीकोनातून तसेच औरंगाबाद परिसरातील लहान व मोठ्या उद्योगांच्या गरजा व जागतिक बाजार पेठे बरोबर स्पर्धात्मक गुणवत्ता वाढविण्यासाठी '' वाहन उद्योग समुह प्रकल्प '' राबविणे आवश्यक आहे. सदरचा प्रकल्प हा चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर यांच्या अधिपत्याखाली राबविण्याचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे.

वरील प्रकल्पासाठी रू.६७.०० कोटी रक्कम उपलब्ध करावयाचा आहे. त्यापैकी रू.५०.०० कोटी केंद्र शासन अनुदान स्वरूपात देणार आहे. उर्वरित रू.१७.०० कोटी रक्कम या समुहात सहभागी होणाऱ्या घटकाकडून उपलब्ध करावयाची आहे.

उपरोक्त प्रकल्पासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने विशेष उद्देशिय वाहन (Special purpose vehicle) अंतर्गत सहभागापोटी रू.७.०० कोटी Equity स्वरूपात व रू.२.०० कोटी बिनव्याजी लोन स्वरूपात परताव्याच्या अधिन राहून अर्थसहाय्य करावे लागणार आहे.

सदर वाहन उद्योग समुह विकास प्रकल्प राबविल्यास पुढील चार ते पाच वर्षात औरंगाबाद विभागास दशांतर्गत विक्रीसाठी रू.१००० कोटी उत्पन्न मिळू शकेल व सुमारे ३००० लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. या प्रकल्पातंर्गत संपूर्ण औद्योगिक Infra Structure, रस्ते, अंतर्गत विकास करता येणार आहे. त्यामुळे या परिसराचा संपूर्ण विकास (रस्ते,पाणी,ड्रेनेज,लाईट इ.) महानगरपालिकेस या योजनेतंर्गत करून मिळणार आहे. तसेच या परिसराचा विकास झाल्याने महानगरपालिकेस मालमत्ता कर व जकात कर या क्षेत्रातून उत्पन्न स्वरूपात प्राप्त होणार आहे व नविन उद्योग येथे प्रस्थापित होऊन शहराच्या विकासास हातभार लागणार असून नव्याने रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

सदर प्रकल्प हा चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रात उभारण्याचे नियोजन आहे. मराठवाडा पॅकेज अंतर्गत मा.मुख्यमंत्री यांनी या योजनेस मदत करण्याचे घोषीत केले आहे. सदरील प्रकल्प राबविण्याकरीता महानगरपालिकेतर्फे या संस्थेत Equity च्या प्रमाणात सदस्य आयुक्त महानगरपालिका नामनिर्देशित करतील.

करिता उपरोक्त प्रकल्प केंद्र शासनाच्या पुढाकाराने चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर यांच्या अधिपत्याखाली करावयाचे असल्याने व प्रस्तावित प्रकल्पास लागणारा निधी हा SPV संस्थेस उपलब्ध करून देण्यासाठीचा सदरचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : यावर प्रशासनाने मत मांडावे.

मा.आयुक्त :या शहरासाठी हे महत्वाचे असून केंद्र शासनाची एक योजना असून २ वर्षापूर्वीची आहे हा ठराव एक ते दीड वर्षापूर्वी केला असता तर महानगरपालिकेस पैसे प्राप्त झाले असते. केंद्र शासनाने या शहराच्या परीसरात मधे ॲटो कंपनीची त्यांचे वृध्दीची फारच वाव असून ॲटो क्लस्टर म्हणून जाहीर केलेले आहे केंद्र शासनाची स्कीम मध्ये औरंगाबादची निवड केलेली आहे एक कंपनी निश्चित करण्यात येते. ६७ कोटी खर्च होवू शकते त्यापैकी ५०कोटी शासनाकडून ग्रँड म्हणून मिळणार आहे १७ कोटी जे आहे ते स्थानिक पातळीवर जमा करायचे आहे ही कंपनी ६७ कोटी खर्च करतील ज्यांच्यामूळे या शहरातील अँटो क्लस्टर कंपन्याना जागतिक पातळीवर जाण्यासाठी मदत होईल त्याची प्रत उंचावण्यात येतील त्यांना मार्केट मिळेल १७ कोटी स्थानिक पातळीवर उभारणी करावयाच आहे. १७ कोटी पैकी ९ कोटी महानगरपालिकेने दयावे ७ कोटी दयावे ज्याचे डिवींडंउ आपणास मिळतील २ कोटी कर्ज म्हणून दयावे ते परत मिळतील उर्वरीत आठ कोटीमधे औद्योगिक वसाहत आहेत यात महाराष्ट्र शासनाचा सहभाग होवू शकतो एमआयडीसीचाही सहभाग होवू शकतो १७ कोटी देवून ६७ कोटी या शहरासाठी खर्च होतील त्यापैकी २५-३०कोटी हे चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमधे करावे उर्वरीत ३७ कोटी मध्ये एक सेन्टर होणार आहे टेस्टीग सेन्टर

आहे डिजाईन सेन्टर आहे ज्यावेळी महानगरपालिकेत अधिकारी म्हणून होतो त्यावेळी ही स्कीम आलेली होती त्या महानगरपालिकेस पैसे पण मिळालेले होते असा ठराव झाल्यानंतर मार्च/एप्रिल पर्यंत केद्र शासनाचे पैसे येवू शकतील.९ कोटी हे ३ वर्षात दयायचे असून त्यापैकी दोन कोटी परत मिळणार आहे उर्वरीत ७ कोटीवर डीव्हींडड मिळणार जेव्हा हे करतील तेंव्हा एवढे पैसे खर्च करीत आहे म्हणून या कपंनीवर महानगरपालिकेतर्फे ३ -४ अधिकारी बोर्डवर संचालक असतील ते कन्ट्रोल करतील महानगरपालिका क्षेत्रामधे कमीत कमी ५००-६०० ने वाढ झाली तर जकातीमधे फायदे असतात मालमत्ता कर वाढतो इतर कर वाढतो त्यातून शहराचा विकास होतो यास मंजूरी मिळावी अशी विनंती आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: या पासून शहराला फायदा होणार आहे विकास कामास मदत होईल २ कोटी देणार आहे तर कोठून देणार आहे बजेटमधे नमूद नाही प्रशासकीय खर्चातून हे देण्यात यावे विकास कामे कमी करू नये.

श्री.जोशी संजय :शहराच्या नागरीकांना याचा काय फायदा होणार आहे.एपीआय सरख्या अटोमोबाईल्स कंपनी बंद पडल्या जागतिक पातळीवर म्हटले तर उदा. होंडा कंपनीचा पार्ट येथे टेस्टींग साठी येणार आहे का ?बजाज पूणे डिव्हिजन येथे टेस्टींगसाठी येणार आहेत का मारूती मोटारचे दिल्लीहून टेस्टीगसाठी येणार आहे का या कमेटीवर कंपनीचे लोक राहतील शासनाशी चर्चा वगैरे झालेली आहे का या कमेटीवर मा.आयुक्त असतील का हा सर्व खुलासा करावा.

मा.आयुक्त :ही कंपनी जी टेस्टींग फॅसीलीटीज नवीन डिझाईन टेक्नीकल बाबी नुसार बनविणार आहे या शहरामधील ज्या ॲटो कंपनीतील युनीटस् आहेत त्यांचेकडून चार्ज घेवून त्यांना करून देणार आहे मशीन तयार करण्यात ५ ते ६ कोटी रूपये लागतात कोणतीही मोठी कंपनीला आपण कंपनी विकू शकत नाही ते आपणाकडून आउट सोर्स करणार नाही.प्रत्येक लहान कंपनीला ५ कोटी खर्च करून कधी ऑर्डर मिळणार म्हणून खर्च करीत नाही ५-६ कोटी कंपनी खर्च करणार आणी पैसे देवून चार्ज देवून वापर करणार ते पैसे मिळतील त्याचे डिव्हीडड आपणास मिळेल.संचालक मंडळात १७ पैकी ९ आपले असतील. गुंतवणूकीच्या प्रमाणात असेल.

श्री.अजीज जागीरदार :चांगली कल्पना आहे महानगरपालिकेला फायदा होणार आहे मंजूर करण्यात यावे.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री.भागवत कराड :हा विषय मंजूर करावा कमेटीमधे जे कूणी अधिकारी असतील त्याप्रमाणे जे कूणी महापौर असतील त्यांचे नाव या कमेटीवर असावेत अशी माझी सूचना आहे.

श्री.अ.रशिद खॉन :महापौर यांना सदस्य म्हणून असावे इतर पदाधिकारी यांना नको.

डॉ.भागवत कराड :या महानगरपालिकेचे यात ७ कोटीचे शेअर्स आहेत २ कोटी परत घेणार जो उत्पन्न असेल लेखा चोखा असेल तो या सभागृहासमोर आणावा सदस्य म्हणून जे कुणी महापौर असतील त्यांना समोवश करावा.

श्री.कोकाटे काशिनाथ :ॲटो क्लस्टरचा जो वार्षिक अहवाल असेल तो वार्षिक अहवाल अंदाजपत्रकीय वर्षात आला पाहिजे कोणत्या पध्दतीने काम करतात आणखी काय करावे लागणार आहे महानगरपालिकेचा कन्ट्रोल असणे आवश्यक आहे त्यामूळे संपूर्ण अहवाल येणे आवशक असून अशी तरतूद करून एक मताने ठराव पास करावा.

श्री.नरवडे वसंत :या शहराच्या विकासाच्या दृष्टीने व औद्योगिकरणाला महत्व येईल हे शहर जागतिक शहर म्हणून भारताच्या नकाशावर आहे ॲटो क्लस्टरच्या माध्यमातून या शहराच्या विकासा करीता मा.आयुक्त यांचे कडून माहिती घेवून विकासात भर पडेल ठराव मंजूर करावा.

श्री.अ.रशिद खान :कमेटीत कोण असावे पिंपरी चिचंवड तसेच पूणे महानगरपालिकेत असा प्रस्ताव झालेला आहे माहिती घ्यावी त्यानुसार कार्यवाही करावी.

सौ.लता दलाल :किती सदस्य असतील व त्याचे नामनिर्देशन आयुक्त करणार किती सदस्याचे करणार आहे त्यात कोणकोण असेल.

मा.आयुक्त :पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधे १७ कोटी पैकी १४ कोटी दिले होते त्या कमेटीचा मी चेअरमन होतो ७ कोटी देत आहोत २ कोटी परत मिळणार आहे १७ कोटीचे ७ कोटी प्रमाणे जेवढी टक्केवारी येईल त्या प्रमाणात कमेटीवर महानगरपालिकेचे सदस्य राहतील महापौर हे प्रथम नागरीक असतात ते सदस्य नव्हे तर चेअरमन होवू शकतील त्यासाठी ५० टक्के रक्कम ठेवावी लागेल आपण फक्त ७ कोटी ठेवत आहोत २ कोटी कर्ज ठेवले आहे उदया एखादया कंपनीने ३.५० कोटी दिले तरी त्यांचे दूप्पट सदस्य महानगरपालिकेचे राहतील जागा दयावी लागलीस तर ती मोफत न देता ९ कोटीच्या अगेनेस्ट मध्ये देणार आहोत.

मा.महापौर :विषय क्र.९ कंपनीचा जो काही लेखा जोखा असेल तो दरवर्षी सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा या दुरुस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद परिसरात वाहन उद्योग समुह प्रकल्प चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर यांचे अधिपत्त्याखाली राबविण्याचा महाराष्ट्र शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असल्याने सदर प्रकल्पास केंद्र सरकार ७५% अर्थसहाय्य अनुदान स्वरूपात देणार आहे व २५% रक्कम या समुहात सहभागी होणाऱ्या घटकाकडून जामा होणे अपेक्षित असल्याने या प्रकल्पासाठी रू.६७.०० कोटी रक्कम उपलब्ध करावयाची असल्याने त्यापैकी रू.५०.०० कोटी केंद्र शासनाकडून अनुदान व उर्वरीत रू.१७.०० कोटी रक्कम या समुहात सहभागी होणाऱ्या घटकाकडून उपलब्ध करावयाची आहे. या प्रकल्पासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने विशेष उद्देशिय वाहन (Special purpose vehicle) अंतर्गत सहभागापोटी रू.७ कोटी Equity स्वरूपात व रू.२ कोटी बिनव्याजी लोन स्वरूपात परताव्याच्या अधिन राहून अर्थसहाय्य करणेस तसेच प्रकल्पातंर्गत औद्योगिक भौतिक (Infra Structure) विकास करता येईल. सदर प्रकल्प चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रात उद्यडण्यास आणि सदरील प्रकल्प राबविण्याकरीता महापालिकेतर्फे या संस्थेत Equity च्या प्रमाणात सदस्य महापालिका आयुक्त नामनिर्देशित करतील. सदर प्रकल्पास लागणारा निधी हा SPV संस्थेस उपलब्ध करून देण्यास आणि सदर कंपनीचा लेखा जोखा दरवर्षी सर्वसाधारण सभेत ठेवण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/१० :**

औरंगाबाद महानगरपालिकेने ''वाहतुकनगर'' विकसीत करणेसाठी औरंगाबाद शहर वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील आरक्षण क्र.१३ नॉन कन्फर्मींग इंडस्ट्रीजमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करून वाहतुकनगरीचे आरक्षण करण्याबाबत मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४६/२ दि.१६.०९.१९९२ अन्वये मान्यता झाली त्यावर कार्यवाही होऊन शासन नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.टि.पी.एस.३०९९/१०६/प्र.क्र.२९/९९ न.वि.३०, मंत्रालय,मुंबई दि.२६ मे २००० अन्वये मान्यता दिली आहे. या नुसार ''कृषी उत्पन्न बाजार समिती औरंगाबाद '' यांचेकडून औरंगाबाद महानगरपालिकेला वाहतुक नगरासाठी मिळालेल्या जागेसह पूर्वेकडील स.नं.१२७ (भाग), १३० ते १३८ (भाग) व स.नं.१६ (भाग) जाधववाडी अशी सुमारे २०.५ हेक्टर जागा आरक्षण क्र.१३-अे अन्वये वाहतुक नगरासाठी आरक्षित ठेवण्यात येत आहे.

शहराचे आरोग्य प्रदुषणा पासून दूर ठेवणेचे हिताने शहरात होणारी जड वाहनांची वर्दळ पाहता औरंगाबाद शहरासाठी वाहतुकनगर विकसीत करणे अत्यंत आवश्यक आहे.

शासन मान्यतेनुसार वाहतुक नगरासाठी मनपाने कृषी उत्पन्न बाजार समिती कडून १० एकर जागेचा ताबा दि.०७.०४.१९९८ रोजी प्रत्यक्ष मनपास मिळाला आहे.

आता सदर उर्वरीत जागा कृषी उत्पन्न बाजार समितीकडून घेणेचे (संपादीत करणेचे) खाजगी वाटाघाटीने (संपादीत करणेचे) मान्यतेस्तव तसेच ही जागा ट्रक ट्रान्सपोर्ट असोशिएशन औरंगाबादला प्रशासकीय कार्यवाही करून अटी शर्तीसह देणेच्या मान्यतेस्तव व वाहतुक नगरासाठी वरील जागा कमी पडल्यास अथवा असोसिएशन ने आवश्यकता दर्शविल्यास महानगरपालिकेच्या हद्दीत इतरत्र सरकारी जागा घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर. प्रस्ताव मान्यतेनंतर संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना राहतील. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.अनिता घोडेले :जाधववाडी भागात १० एकर जागा आहे उर्वरीत विकत घ्यावी लागेल कांचनवाडी भागात सरकारी गायराण जमीन ६५ एकर आहे मागणी केली तर महानगरपालिकेस जागा मिळू शकते आरटीओ कार्यालय तेथे होणार असून बायपास रस्ते आहे वाहतूकीची वर्दळ तेथे राहणार नाही भविष्यामधे दूसरे वाहतूकनगर हे कांचणवाडी पैठण रोड येथे व्हावे असा ठराव मंजूर करावा.

डॉ.भागवत कराड :रस्त्यावर जागोजागी ट्रक उभ्या असतात या शहरात अपघात कमी करायचे असतील वाहतूकतळ करण्याची गरज आहे या संदर्भात मी महापौर असतांना बैठक घेतली होती त्यावेळी अशी सूचना मांडण्यात आली २० एकर जागा मिळणार आहे १० एकर महानगरपालिकेच्या ताब्यात असून उर्वरीत जागा मिळणार आहे ही पूरेशी होत नाही आताच स.सदस्या यांनी सुचवले कांचनवाडी येथे ६५ एकर जागा आहे जेथे जागा भरपूर असेल तेथेच हे वाहनतळ करण्यात यावे.

श्री.देसरडा प्रशांत :चांगला प्रस्ताव आहे.वाहतूक नगर साठी किती ठिकाणी आरक्षीत जागा आहेत मिटमिटा भागात आहे असे वाटते. मार्केट कमेटी जागा देईल का ? हा खुलासा करावा यात असे की सदरील जागा मार्केट असोसिएशनला ही जागा दयावी ही जागा ट्रक असोसिएशनला दयावी असे पाहिजे.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :१० एकर जागा ताब्यात आहे आणखी रिझर्वेशन आहे सर्वसाधारण सभेने मान्यता दिली शासनाने दिली तर २० एकर आणखी जागा एकूण ५० एकर आहे जी जागा घेतली व उर्वरीत राहिली ती घ्यावी त्यासाठी कमीत कमी पैसे ५० टक्के हे मालमत्ता कर येणे आहे त्यात ते वजा होवू करू शकतो भविष्यात हे शहर १५-२० लक्ष लोक संख्येचे होणार आहे कोणत्या ही शहराला दोन भागात शहराच्या बाजूला वाहतूक नगर असते एक हे होईल दूसरे ज्या सरकारी जागा उपलब्ध असतील मा.जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार करून ती जागा ताब्यात घेणे . तिसरा मूद्दा वाहतूक नगर करण्यासाठी फारच पैसे लागतात दूकाने असणार वर्कशॉप असेल पूर्ण डेव्हलप करण्यासाठी ट्रक असोसिएशन किंवा वाहतूक असोशिएशनच्या यांना दयावे त्यांनी पूर्ण विकास करावा पूर्ण खर्च करावा व जे वसूली होईल त्यातील वाटा महानगरपालिकेस दयावा.यापूर्वी तत्तकालीन महापौर यांनी चर्चा केलेली होती. अटी व शर्ती जे टाकतील ते पूर्ण विचाराधीन सर्वसाधारण सभेसमोर येतील.

श्री.देसरडा प्रशांत :ट्रक असोसिएशन एकच आहे दूसरी संस्था असेल तर बीओटी पध्दतीने त्यांना देण्यास हरकत नसावी यात दोन तीन संस्था सहभागी झाल्यास स्पर्धा होईल नसता ट्रक असोसिएशन जे दर म्हणतील त्या दरानेच काम दयावे लागेल. असे होवू नये.

मा.आयुक्त :वाहतूक नगर झाल्यानंतर शहरात एक ही पार्कींग असणार नाही पूर्ण वाहने वाहतूक नगर येथे असेल ट्रक असोसिएशन यांचेशी चर्चा करून अटी शर्ती या संदर्भात चर्चा करायची फायनल साठी सर्वसाधारण सभेसमोर येईल.

श्री.देसरडा प्रशांत :बीओटी पध्दतीने वाहतूक नगरचा विकास करण्यास स्पर्धा झाली पाहिजे अशी कार्यवाही करावी.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ: वाहतूक नगरची गरज आहे या शहरातील परीस्थिती बघीतली तर मार्केट कमेटी आहे त्या ठिकाणी जड वाहतूक साठी करावे दूसरे पैठण रोड येथे करावे बीओटी पध्दतीने जेव्हा काम करतो त्यास ट्रक असोसिएशनच पाहिजे असा भाग नाही जो कुणी कंपनी करेल खर्च कमी लागेल हा सर्व अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात यावे

श्री.देसरडा प्रशांत :मिटमिटा भागात वाहतूकनगरसाठी आरक्षीत जागा आहे तेथे का करण्यात येत नाही.

श्री.अ.रशिद खान :जाधववाडीत १० एकर जमीन आहे त्यांचेकडे २० एकर जमीन असेल तर देऊ शकत नाही का ? ट्रान्सपोर्ट यूनीयन मजबूत आहे महानगरपालिके मार्फत वाहतूकनगर विकसीत केल्यास सुविधा दिल्या जात नाही त्यामुळे जाण्यास तयार नाही मा.आयुक्त यांनी ट्रान्सपोर्ट युनियन यांचे बरोबर चर्चा करून निर्णय घ्यावा कृषी उत्पन्न बाजार समितीमधे एक नगरसेवक सदस्य म्हणून पाठविले त्यानीही या जागेसाठी प्रयत्न करावे मार्केट कमेटी उत्पन्न करते परंतू सूविधा देत नाही.

श्री.नरवडे वसंत :वाहतूक नगर हे शहरात पूर्व आणी पश्चिम असे दोन भागात व्हावे अशी सूचना आहे.

डॉ.भागवत कराड :जाधववाडी येथील जागा कमी पडू शकते त्यासाठी ज्या ठिकाणी वाहतूकनगरसाठी आरक्षीत जागा असेल त्याची चौकशी करावी पडेगाव मिटमिटा किंवा पैठण रोड लगत कूठे जागा असेल तेथे आणखी एक ट्रक टर्मिनल तयार करावे वाहतूक नगर करावे अशी सर्वाची भावना आहे तसे मा.आयुक्त यांना अधिकार देवून तात्काळ वाहतूक तळ करावे शहरात काही खाजगी गाडया ज्या मुंबई पुणे मोठया शहरात जातात त्या रस्त्यावर उभ्या असतात त्यासाठी सुध्दा या शहरात आरक्षीत जागा आहे या जागा सुध्दा महानगरपालिकेने तात्काळ ताब्यात घ्याव्यात व खाजगी वाहतूक तळ तयार केल्यास रस्त्यावर गाडया उभ्या राहतात त्या राहणार नाही हा सुध्दा प्रस्ताव या सभागृहासमोर सादर करावा.

सहा.संचालक(न.र) :ही जागा रिझर्वेशनचीच जागा आहे इतर ठिकाणी रिझर्वेशन आहे किंवा नाही याची माहिती घ्यावी लागेल.

श्री.देसरडा प्रशांत :वाहतूकनगरसाठी रिझर्वेशन कोठे आहे हे प्रशासनाला माहित नसेल तर ठराव ठेवतांना संपूर्ण अभ्यास करून ठेवला पाहिजे.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :ही जागा रिझर्वेशनची आहेतच आणखी कुठे असेल तर त्याची चौकशी करावी व पून्हा दूसऱ्या ठिकाणी वाहतूक तळ करण्या संबधीचा प्रस्ताव सादर करावा.

श्री.देसरडा प्रशांत : आरक्षीत जागा ही ट्रान्सपोर्ट युनीयन यांना मान्य नसेल त्यामूळेच या जागेविषयी विचार करण्यात आला असावा.जेथे आरक्षीत जागा आहे तेथे वाहतूक तळ का करण्यात येत नाही.

श्री.जागीरदार अजीज :प्रस्तावातच नमूद केले की वाहतूक नगर साठी जागा कमी अथवा असोसिएशनने आवश्यकता दर्शविल्यास महानगरपालिकेच्या हद्दीत इतरत्र सरकारी जागा मिळण्याच्या मान्यतेनुसार प्रस्तावसादर सर्व अधिकार मा.आयुक्त यांना राहतील असे दिले चर्चा करून उपयोग काय रिझर्वेशन वरील जागा घेतच आहोत पून्हा इतरही ठिकाणी जागा घेणारच आहोत म्हणून प्रस्ताव मान्य करावा.

श्री.देसरडा प्रशांत :आरक्षित असलेली जागा ही यापूर्वी डिलीट केलेली आहे का ?

मा.महापौर :विषय क्र १० मंजूर करण्यात येतो ट्रान्सपोर्ट असोसिएशनला प्राधान्य देण्यात यावे ते करण्यास तयार नसेल तर बीओटी पध्दतीने करण्याची कार्यवाही करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती औरंगाबाद यांचेकडून औरंगाबाद महानगरपालिकेला वाहतुक नगरासाठी मिळालेल्या जागेसह पूर्वेकडील स.नं.१२७ (भाग), १३० ते १३८ (भाग) व स.नं.१६ (भाग) जाधववाडी अशी सुमारे २०.५ हेक्टर जागा आरक्षण क्र.१३-अे अन्वये वाहतुक नगरासाठी आरक्षित ठेवण्यास व शहरासाठी वाहतुकनगर विकसीत करणेस तसेच वाहतुक नगरासाठी महापालिकेने कृषी उत्पन्न बाजार समिती कडून १० एकर जागेचा ताबा दि.०७.०४.१९९८ रोजी प्रत्यक्ष महापालिकेस मिळाला आहे. आता सदर उर्वरीत जागा कृषी उत्पन्न बाजार समितीकडून घेणेस (संपादीत करणेस), खाजगी वाटाघाटीने (संपादीत करणेस) तसेच ही जागा ट्रक ट्रान्सपोर्ट असोशिएशन औरंगाबादला प्रशासकीय कार्यवाही करून अटी शर्तीसह देणेच्या मान्यतेस्तव व वाहतुक नगरासाठी वरील जागा कमी पडल्यास अथवा असोसिएशन ने आवश्यकता दर्शविल्यास महानगरपालिकेच्या हद्दीत इतरत्र सरकारी जागा घेण्यास तसेच या संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेसही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४/११ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, मौजे नक्षत्रवाडी गट क्रमांक ८६ (भाग) मधील क्षेत्रावर आकारण्यात आलेल्या विकास शुल्काबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ अे ते जे नुसार अपिलार्थी वेदांत सहकारी गृह निर्माण संस्था, औरंगाबाद यांनी शासनाकडे अपील सादर करून,

मौजे नक्षत्रवाडी गट नंबर ८६ (भाग), औरंगाबाद या मिळकतीवर सन १९८८ मध्ये तात्पुरत्या रेखांकनाच्या Suggested Plan ला मान्यता मिळालेली असल्याने जमिन विकास शुल्क आकारू नये. त्यांनी भरलेले जमिन विकास शुल्क रक्कम रूपये १,५८,३८०/- ही रक्कम ३६% चक्रवाढ व्याजाने परत मिळावी व चुकीच्या पध्दतीने विकास शुल्काची आकारणी केल्याने भरपाई/दंड म्हणून रूपये १,००,०००/- मिळावेत अशी मागणी केली.

अपीला संदर्भाने औरंगाबाद महानगरपालिकेचे म्हणणे कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/नरवि/ २४२२/२००४, दिनांक २३.०९.२००४ नुसार शासनास सादर करण्यात आले. याच अपीला संदर्भाने शासनाने मा.संचालक, नगर रचना,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडूनही अभिप्राय मागविण्यात आले होते. औरंगाबाद महानगरपालिकेनी केलेली विकास शुल्काची आकारणी योग्य असून अपीलकर्त्याचे अपील फेटाळणे योग्य होईल असा मा.संचालक नगर रचना,महाराष्ट्र राज्य पुणे यांचा अभिप्राय होता.

तथापी शासनाने अपिलार्थीचे म्हणणे भागश: मंजुर करून खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

०१. प्रस्तुत प्रकरणी औरंगाबाद महानगरपालिकेने सदर अपिलकर्ते यांचेकडून केलेली जमिन विकास शुल्काची आकारणी रद्द करण्यात येत आहे.

०२. अपिलकर्ते यांनी भरलेले जमिन विकास शुल्क रूपये १,५८,३८०/- ते भरल्याच्या दिनांका पासून सदर रक्कम प्रत्यक्ष परत देण्याच्या दिनांका पर्यंतच्या कालावधीसाठी प्रति वर्ष १४% व्याज यासह देण्याची कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेने करावी.

शासनाचे आदेश संचिका क्रमांक टिपीएस-३००३/२/प्र.क्र.४३/२००५/नवि-३० दि.२७ मे २००५ ची प्रत प्रस्तावा सोबत सादर करण्यात येत आहे.

शासन निर्णयानुसार जमिन विकास शुल्क रक्कमेच्या परताव्यासाठी अपिलकर्ते वेंदात सहकारी गृह निर्माण संस्था यांनी दिनांक १५/०६/२००५ रोजी अर्ज सादर केला आहे.

तरी जमिन विकास शुल्काची रक्कम सव्याज परत करण्यासाठीचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

श्री.संजय जोशी :या महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती नसतांना नियमाला अधिन न राहता जर यूतीचे महापौर आहेत म्हणून अशी रक्कम वाटायची असेल ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे शासनाने दिलेला निर्णय अतिशय चुकीचा असून आजपर्यंत शासन दरबारी महानगरपालिकेची हार झालेली असून सफाईसाठी मजूर लाऊ शकत नाही आणि हे ५ लक्ष रूपये ३६टक्के चक्रवाढ व्याजाने नंतर १४ टक्के चक्रवाढ व्याजाने महानगरपालिकेने संबधीतांना दयायचे आहे दुर्दैव असे की आपल्या विभागाने सदर ठिकाणी विषय मांडला महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम अॅक्ट नुसार १२४ अ प्रमाणे १९९२ ला महानगरपालिकेने एक नोटीफिकेशन काढले होते त्यात अशी तरतूद होती की १९८८ म्हणजे १९९२ च्या अगोदर ज्यांचे ले-आऊट तात्पूरत्या स्वरूपात मजूंर केले असतील त्याचा अर्थ पूर्णपणे बांधकाम परवानगी नाही जर ४ वर्षाच्या आत संबधीतानी महानगरपालिकेकडे संपर्क साधला तर त्याचा विचार करावा. तिसरा मूद्दा जर संबधीत जागा मालक जागा वापरात बदल करीत असेल यात नमूद असलेले यांनी ज्यासाठी परवानगी घेतली होती व तो वापर बदलत असेल सुरूवातीला वेगळया वापरासाठी ले आऊट मंजूर केला होता सन २००१ ला त्यांनी रू ५८,३८३/-भरणा करून रो हाऊसेस साठी परवानगी घेतली याचा अर्थ मी आज पैसे दयायचे व महाराष्ट शासनाकडे जायचे शासनाकडून पाहिजे तसा निर्णय आणायचा यात महानगरपालिकेचे नुकसान होते ठराव असा पास करा की असा निर्णय राज्य शासनास दयायचा असेल तर वैयक्तीक संपर्क करावा महानगरपालिकेने उच्च

न्यायालयात जावे या विषयाला चॉलेन्ज करावे जेणे करून महानगरपालिकेच्या पैशाचा विनीयोग होणार नाही हे शहरातील नागरीकांना दाखवून दयावे.

श्री.अ.रशिद खान :न्यायालयात दाद मागवावी नसता कोणीही असे निर्णय घेऊन येतील.

श्री.देसरडा प्रशांत : यात नगररचना पुणे विभागाने अभिप्राय दिला आहे ज्या वेळेस मंत्रीमहोदय प्रकरणाची सुनावणी चालू होती त्यावेळी प्रशासनाने महानगरपालिकेची बाजू काय मांडलेली आहे स.सदस्य श्री. जोशी यांनी मुद्दा बरोबर मांडला त्यास माझी सम्म्ती आहे हा प्रस्ताव मंजूर केला तर इतर अनेक लोकांचे त्यावेळेसचे पैसे असतील त्यांना ते व्याजासह रक्कम दयावी लागेल या प्रस्तावा बाबतीत उच्च न्यायालयात प्रकरण दाखल करून दाद मागवावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :१९८८ ला जी संचिका मंजूर झाली ती संचिका ले आऊटची होती जी २००१ मधे झाली ती ग्रुप हौसींग सोसायटीची होती दोन्ही वेगवेगळे आहे अपील कर्ता यांनी शासनास धोका दिला आहे २००१ मधे संचिका मंजूर झाली ती ग्रुप हौसींग सोसायटीची होती १९९२-२००३ म्हणजे ११ वर्षानंतर शासनाकडे अपील करणे कितपत योग्य आहे या संदर्भात नगररचना विभागाने न्यायालयात अपील करावे व महानगपालिकेच्या बाजूने मत मांडून न्याय मिळवावा.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :या सोसायटीचा चेअरमन कोण, कोणत्या सोसायटी विरूध्द प्रकरण होते ११ वर्षानंतर अपील करून शासनास कोणी मॅनेज केले याचा ही खुलासा करावा.दुसरी बाब अशी की शासनाकडे महानगरपालिकेची बाजू मांडण्यास कमी पडलेलो आहोत का? महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती बरोबर नाही त्यामूळे न्यायालयात या विरूध्द अपील करणे योग्य होईल.

श्री.जागीरदार अजीज :राज्य मंत्री यांनी आदेश दिलेले असून या निर्णया विरूध्द न्यायलयात अपील करू शकतो किंवा नाही प्रशासन का गप्प बसले न्यायालयात का दाद मागविली नाही सदर नमूद केलेली रक्कम देणार आहात का ? सर्व खुलासा करण्यात यावा.

डॉ. कराड भागवत :लोक नियुक्त बॉडी आहे आदेश कूणाचाही असेल त्या संदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार या सभागृहाला आहे महानगरपालिकेची आर्थिक परीस्थिती विचारात घेता सदर रक्कम देण्यात येवू नये.

मा.महापौर :शासनाने दिलेला निर्णय हा चुकीचा आहे, शासनाच्या विरूध्द महानगरपालिकेने कोर्टात दाद मागावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संदर्भात शासनाच्या निर्णया विरूध्द महानगरपालिकेने सक्षम न्यायालयाकडे दाद मागावी. असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.जोशी संजय : रूपये ३.५० कोटीची कामे डायरेक्ट केली म्हणून वृत्तपत्रात आले यात महानगरपालिकेची बदनामी होते प्रशासनाने या कामाना मंजूरी घेतलेली होती का व ही कामे झालेली आहे का खुलासा घेण्यात यावा.

श्री.जागीरदार अजीज :सदर संचिका गहाळ होती नंतर आढळून आली जे २.५० कोटीचे कामाचे ठराव स्थायी समितीची मान्यता घेवून करावे म्हणून तत्कालीन आयुक्त यांनी शेरा दिला होता स्थायी समितीची मान्यता न घेता अगोदरच त्या कामाचे बील अदा करण्यात आलेले आहे.

अति.शहर अभियंता :३.५० कोटीची कामे स्थायी समितीची मंजूरी न घेता झाली वृत्तपत्रात आले ही बातमी चुकीची असून ३.५० कोटीची नसून २.५० कोटीची कामे होती या सर्व कामांना सर्वसाधारण सभा व स्थायी समिती सभेची मंजूरी घेतलेली आहे संचिका गहाळ झालेली नव्हती मा.सभापती यांनी जेव्हा संचिका मागविल्या त्यांना रितसर खतवून पाठविल्या होत्या.

श्री.जागीरदार अजीज :वृत्तपत्रात खोटी बातमी आली त्या संदर्भात काय कार्यवाही करणार आहात.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा केलेला आहे.

## स.सदस्यांचे प्रस्ताव.

**विषय क्र. ५५/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक ३०.०७.२००५ रोजी शहराला पा.पु.करणारी म.न.पा.ची १४०० एम.एम. व्यासाची जलवाहिनी फुटल्याने विटखेडा फाटा (पैठण रोड) लगतच्या नागरीकांचे जवळपास रू.३५,०००/- (रू.पस्तीस हजार) चे नुकसान झाले आहे.

तरी ज्या नागरीकांचे नुकसान झाले आहे, त्यांची नुकसान भरपाई पोटी रू.३५०००/- ची महानगरपालिकेतर्फे मदत मानवीय दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून करणेचा प्रस्ताव मंजुर करून नुकसान भरपाई देण्यांत यावी.

सुचक : सौ.अनिता घोडेले, श्री.राजु वैद्य अनुमोदक : सौ.लता दलाल

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :भावनीक दृष्टया हा विषय सादर केलेला आहे महानगरपालिकेच्या माध्यमातून सामान्य नागरीकाचे जर नुकसान झाले तर त्यांना मदत देण्यासाठी सर्वच भागाकरीता या सभागृहाने एक धोरणात्मक निर्णय घ्यावा यावर गंभीर विचार करावा असे अनेक ठराव येतील.व मदत दयावी लागेल.

सौ.लता दलाल :या प्रस्तावास मी अनुमोदन असून चूक अशी की महानगरपालिकेची जलवाहिनी फूटल्यामूळे तेथील गरीब कुटूंबाचा संसार वाहून गेला त्याचे नुकसान झाले हा भावनीक विषय नसून मानवतेच्या दृष्टीने मान्यता दयावी.

श्री.जागीरदार अजीज :२ वर्षापूर्वी सिल्क्मिल कॉलनी भागात अशाच प्रकारे घटना झाली होती तेथील बाजूच्या लोकांचे लाखोचे नुकसान झाले त्यांना काहीही मदत दिली नाही हा ठराव पास करताना त्याचा ही समावेश करावा.

श्री.देसरडा प्रशांत :ले-आऊट मंजूर असलेल्या भागात जेथे लोकांनी घर बांधलेली होती भागात जलवाहिनी फूटून लोकांचे नुकसान झाले होते त्या लोकांना आर्थिक मदत दिली किंवा नाही याचा खुलासा करावा.

सौ.घोडेले अनिता :महानगरपालिकेच्या पाईपलाईन फुटल्यामूळे एका मजूराचे संपूर्ण सामान वाहून गेले मा.महापौर यांनी सुध्दा पाहणी केली होती त्या गरीब कूटूंबाना मदत करावी.

श्री.कचरू सोनवणे :या शहरात जोराचा पाऊस झाला आंबेडकर नगर भागात मातीच्या भिंती खाली पडून एक शाळकरी मूलगा मृत्यू झाला मा.महापौर आपण व उपमहापौर यांनी भेट दिली होती त्या मुलाचे आईवडील अत्यंत गरीब आहे त्यांनाही आर्थिक मदत करण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड :अशा घटना ज्या वार्डात घडतात त्या व्यक्तीला नगरसेवक निधीतून मदत करण्यास मान्यता दयावी.

डॉ.भागवत कराड :अशा घटना घडतात तेंव्हा मदत देण्यासाठी एक धोरण ठरवावे महानगरपालिकेच्या फंडातून की. स्वेच्छा निधीतून की महापौर फंडातून देणार आहात धोरण निश्चित करावे एकाच प्रकरणाचा विचार करू नये आर्थिक मदत दिली पाहिजे परंतू किती आणि कोठून दयायची धोरण ठरवावे.

श्री.रेणूकादास वैद्य :घरे पडून ही दूर्घटना होणे वेगळे आहे परंतू महानगरपालिकेची जलवाहिनी फुटून कुणाचे नुकसान झाले असेल तर त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

श्री.जागीरदार अजीज :स्टॅण्डर्ड सिल्कमिल कॉलनी भागात जलवाहिनी फुटली होती त्या लोकांचे ही नुकसान झाले त्यांनाही ही मदत दयावी याच ठरावात दुरूस्ती करून मान्यता दयावी या घटनेचा पंचनामा सुध्दा झाला आहे.

डॉ.भागवत कराड :भावनीक प्रश्न मांडून महानगरपालिका चालविता येणार नाही .महानगरपालिकेच्या पाईपलाईनमूळे नुकसान झाले परंतू ते घर अधिकृत होते का याचा विचार होणे आवशयक आहे बांधकाम परवानगी दिली होती का ? असे सर्वच प्रकारे विषय आले तर पूर्ण फंड वाटप करण्यास कमी पडेल अनधिकृत बांधकाम करणार नुकसान झाल्यास मदत मागणे हे बरोबर नाही सहानुभूतिच व्यक्त करतात तर स्वेच्छा निधीतून देता येईल का मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

सौ.घोडेले अनिता : पाईपलाईन ही शेतातून येते व तो मजूर शेतामधे राहत होता ते अधिकृत असून नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे.

मा.महापौर :प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त :घर अधिकृत असेल व महानगरपालिकेमूळे नुकसान झाले असेल तर मदत देणे भाग आहे किती नुकसान झाले याची माहिती घ्यावी लागेल त्यानुसार तरतूद असेल तर देता येईल.

श्री.जागीरदार अजीज :सिल्कमील कॉलनीत पाईपलाईन मूळे नुकसान झाले होते त्या संदर्भात पंचनामे झाले आहे त्यांना ही मदत करावी याच ठरावात दुरूस्ती करून मंजूरी दयावी.

सौ.लता दलाल :अनधिकृत वस्ती नव्हती ती व्यक्ती शेतात राहत होते ही जलवाहिनी फुटल्यामूळे शेतात घर होते त्यातील सामान वाहून गेले. म्हणून नुकसान भरपाई देण्यात यावी.

श्री.गायकवाड दिलीप :रोजाबाग भागात २ वर्षापूर्वी दूषित पाण्यामूळे शेकडो बालंकाना गॅस्ट्रो झाला होता त्यांना आर्थिक मदत दिलेली होती का ?

श्री.रेणूकादास वैद्य :पंचनामा होईल परंतू आज त्या कुटूंबास आर्थिक मदतीची गरज आहेत महानगरपालिकेमुळे नुकसान झाले जे शक्य होईल तेवढी मदत करण्यात यावी व अशा घटना बाबत धोरणात्मक निणर्य यापूढे घेण्यात यावा.

श्री.देसरडा प्रशांत :माझ्या वार्डात असे नुकसान झाले होते प्रशासनाने पाहणी केली होती पंचनामा झाला होता मदत देणार की नाही प्रशासनाची भूमिका काय आहे त्याच महिण्यात दूसऱ्या भागातील अशाच घटनेबाबत ठराव झालेला होता त्यांना आर्थिक मदत दिलेली आहे.

मा.महापौर :या संदर्भात प्रशासनाने स्थळ पाहणी करावी किती नुकसान झाले याची चाचणी करून जेवढी मदत करता येईल तेवढी मदत करावी व पूढील सभेत श्री.प्रशांत देसरडा यांचे वार्डातील ठरावाच्या बाबतीत काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

श्री.देसरडा प्रशांत :अशाच प्रकारचा माझ्या वार्डातील ठराव पास झालेला आहे आपल्या हस्ते मदत करावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावा संबंधी प्रशासनाने स्थळ पाहणी करून किती नुकसान झाली याची चाचणी करून जेवढी मदत करता येईल,तेवढी मदत करणेस तसेच श्री.प्रशांत देसरडा यांचे वार्डातील ठरावाच्या बाबतीत काय कार्यवाही केली याची माहिती देणेसही मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ५६/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७३ एस.टी.कॉलनी जालना रोड येथील ए.पी.आय. कॉर्नर,भवानी चौक म्हणून नामकरण करण्यात यावे, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यांत येत आहे.

सुचक : श्री.दामोधर माधवराव शिंदे अनुमोदक : श्री.बाबासाहेब डांगे, श्री.बन्सीलाल गांगवे.

सौ. पाटील दिपाली :एपीआय कॉर्नर हा भाग वार्ड क्र २४ मध्ये येतो या वार्डाचे मी प्रतिनिधीत्व करते या प्रस्तावात माझे नाव असावे मला न विचारात घेता प्रस्ताव ठेवलेला असून स्थगित ठेवण्यात यावे.

मा.महापौर :प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ५७/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका, महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेतील महिला व बाल कल्याण समिती सभापतीची एक राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात यावी. या परिषदेमुळे महाराष्ट्रातील महानगरपालिकास्तरीय महिला व बाल कल्याण समिती यांचे उद्दीष्टांची पुर्तता करणे नवनविन योजना राबविणे व त्यामुळे महिला व

बाल कल्याण समितीचे कामे प्रभावी रीत्या मदत होईल. सदर राज्यस्तरीय परिषदेसाठी महिला व बाल कल्याण समितीच्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून आर्थिक खर्च भागविण्यात यावा.

सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.मनिषा अमर महाजन अनुमोदक : सौ.अंजली दिलीप कोंडेकर, सौ.अनिता नंदकुमार घोडेले

सौ.अनिता घोडेले :महिला व बाल कल्याण समिती यांचे सभापती व उपसभापती याची राज्य स्तरीय परिषद आयोजित करण्याचा ठराव आहे विविध क्षेत्रातील महिलाचे कामकाज व विविध योजनाची माहिती एकूण धोरण याबाबत चर्चा होणे अपेक्षित आहे या परीषदेतून महिला बाल कल्याण समितीची कामाची विधायकता व धोरण या वर चर्चा होणे अपेक्षित आहे दुर्बल घटकातील महिलासाठी या परीषदेच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यास मदत होईल ही परीषद या महानगरपालिकेत पहिल्यादांच राज्यस्तरीय परीषद होत आहे त्यामूळे या शहराचे नाव उंचावावे म्हणून या प्रस्तावास खर्चासह मंजूरी दयावी.

श्री.अ.रशिद खॉन :महिला सदस्यांना या संदर्भात माहिती उपलब्ध होईल मंजूर करण्यात यावे.

श्री.संजय जोशी :यापूर्वी डॉ. भागवत कराड हे महापौर असतांना अखिल भारतीय महापौर परीषद घेतली होती महापौरांनी सुध्दा एक अखिल भारतीय महापौर परीषद घ्यावी अशी माझी सुचना आहे.

सौ.लता दलाल : खर्चासह मंजूरी देण्यात यावी पूढील कार्यवाही सुरू होईल.

श्री.अ.रशिद खान :तरतूद केलेली नसल्याने स.नगरसेवकांच्या निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात यावे.

डॉ.भागवत कराड :महिला बाल कल्याण समिती साठी ४० ते ५० लक्ष बजेट असते त्यातून खर्चास मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौर :खर्चासह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका, महिला व बाल कल्याण समितीच्या वतीने या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकेतील महिला व बाल कल्याण समिती सभापतीची एक राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यास व सदर राज्यस्तरीय परिषदेसाठी महिला व बाल कल्याण समितीच्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून आर्थिक खर्च भागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्राचे प्रख्यात नाटककार डॉ.लक्ष्मण देशपांडे यांचे नाटक ‘वऱ्हाड निघाले लंडनला’ जगभर प्रसिध्द आहे व या नाटाकची ग्रीनिज बुक ऑफ वल्ड मध्ये ही नोंद घेण्यात आलेली आहे.

करीता वऱ्हाडकार डॉ.लक्ष्मण देशपांडे यांना महानगरपालिकेच्या वतीने सन्मानपत्र व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात यावे. याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट, श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन, श्री.रेणुकादास वैद्य

मा.महापौर :या प्रस्तावात मंजूरी देण्यात येते सभा तहकूब केली होती म्हणून हा प्रस्ताव उशीरा सादर होतो आहे या संदर्भात कार्यक्रम झालेला आहे.

श्री.पाथ्रिकर दत्ताभाऊ : नाटकार या बरोबरच क्रिडा क्षेत्र आहे साहित्यिक, तसेच कवी आहे अशा कलाकांराचाही विचार करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वऱ्हाडकार डॉ.लक्ष्मण देशपांडे यांना महानगरपालिकेच्या वतीने सन्मानपत्र व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची विविध ठिकाणी कार्यालये आहेत. उदा.जकात, यांत्रिकी,उद्यान, प्रभाग कार्यालये इत्यादी. तसेच मनपाच्या ८३ शाळा आहेत. सर्वच कर्मचाऱ्यांना १०३ पालिका सदस्यांना ओळखणे शक्य होत नाही. तसेच विविध सभांचे वेळी आणि इतर

शासकीय व निमशासकीय कार्यालये इ. ठिकाणी पालिका सदस्यांना ओळखता यावे म्हणून 'पालिका सदस्य' लिहिलेले महानगरपालिकेचे बोधचिन्ह असलेले मोनोग्राम/लोगो (अद्याक्षरांची आकृती) सर्व पालिका सदस्यांना तयार करून देणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट, श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.तरवेंद्रसिंग धिल्लन

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेची विविध ठिकाणचे कार्यालय,महालिकेच्या एकूण शाळा तसेच विविध सभांचे वेळी आणि इतर शासकीय व निमशासकीय कार्यालये इ. ठिकाणी पालिका सदस्यांना ओळखता यावे म्हणून 'पालिका सदस्य' लिहिलेले महानगरपालिकेचे बोधचिन्ह असलेले मोनोग्राम/लोगो (अद्याक्षरांची आकृती) सर्व पालिका सदस्यांना तयार करून देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.त्रिंबक तुपे : शहरात लाईटची व्यवस्था बरोबर नाही त्यावर चर्चा करण्यासाठी एक विशेष सभेचे आयोजन करण्यात यावे.बऱ्याच भागात लाईट बंद आहे गणेश उत्सव आलेला आहे.योग्य ती दखल घेण्याच्या सुचना कराव्यात.

श्री.अजीज जागीरदार :स्पेंक कंपनीला सर्वेचे काम दिले व प्रश्न क्र ४ मधे असे उत्तर दिले की अट क्र २ व ९रद्य केलेल्या आहे माझ्या माहितीप्रमाणे ही अट रद्य केलेली नाही चुकीची माहिती दिलेली आहे माझे कर्तव्य आहे सभागृहाच्या निदर्शनास आणून देणे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :वसूली करण्यात येत नाही जास्तीत जास्त वसूली होणे अपेक्षीत आहे वसूली होत नसेल तर कामे ही होणार नाही.

मा.महापौर : गणेश उत्सव असल्यामूळे स.सदस्य श्री तूपे व इतर सदस्यांनी लाईटच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला व विशेष बैठक आयोजित करावी म्हणून मागणी केली प्रयत्न केला जाईल तरी पण प्रशासनास अशी सुचना देण्यात येतात की गणेश उत्सव असल्यामुळे प्रत्येक ठिकाणी प्रशासनाने विशेष लक्ष देवून जेथे कुठे लहान मोठे गणपती असतील तेथे लाईटची व्यवस्था त्वरीत करावी अशी सुचना करण्यात येतात.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : नगरसेवक स्वेच्छा निधीतून फोकस लावण्याची परवानगी देण्यात यावी.

डॉ.भागवत कराड : नगरसेवकांना स्वेच्छा निधीतून फोकस लावण्याची परवानगी देण्यात यावी.

मा.महापौर : नगरसेवक स्वेच्छानिधीतून फोकस लावण्याची परवानगी देण्यात येते. तसेच तारीख २५ ते ३ तारखेपर्यत कचरा संदर्भात स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे त्यानंतर राबविण्यात यावी तसेच गणपती ज्या ज्या रस्त्याने जातील त्या रस्त्याच्या कडेला नाल्या आहे तेथे ढापे टाकण्यात यावे.

या बरोबर ''राष्ट्रगिताने ''सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.